दि. बोदवड सार्व. को.ऑप. एज्यु. सोसा.लि. बोदवड संचालित

**कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड**

ता.बोदवड जि. जळगांव ४२५३१०

**राष्ट्रीय सेवा योजना**

------------------------------------------------------------------------------------------------

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९**

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर अहवाल**

**दत्तक ग्राम हरणखेड, ता. बोदवड, जि. जळगाव**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे विशेष हिवाळी शिबीर दत्तक ग्राम हरणखेड येथे सोमवार दि. २४.१२.२०१८ ते ३०.१२.२०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन दि.२४.१२.२०१८ रोजी सकाळी ११:०० वा. हरणखेड येथील जि.प. शाळेतील अल्पसंख्यांक व दिव्यांग विद्यार्थी, कु. कुंदन खराटे याच्या शुभ हस्ते करण्यात आले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मा. श्री. विकासभाऊ कोटेचा हे होते तर या वेळी गावातील सरपंच श्रीमती समिता रुपेश गांधी, हरणखेड यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली. उपसरपंच श्री. नरहरी एकनाथ वराडे, श्री. रुपेश गांधी, शाळेतील शिक्षक, संस्थेचे संचालक मा.श्री.श्रीरामभाऊ बडगुजर, मा.श्री.अशोकजी जैन, मा.श्री.आनंदजी जैस्वाल, मा.श्री.राविन्द्रजी माटे यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन कार्यक्रमानंतर शिबिरात सहभागी स्वयंसेवकांनी हरणखेड गावाचे शैक्षणिक व आरोग्य विषयक सर्वेक्षण केले व गावाच्या समस्या जाणून घेऊन शिबिरात करावयाच्या कामाचे नियोजन केले. त्यानंतर प्रा. डॉ. व्ही. पी. चौधरी यांनी ग्राम स्वच्छतेचे शिक्षण, आरोग्याचे रक्षण या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. संध्याकाळी सर्व स्वयंसेवकांची एकमेकांशी ओळख करून देण्यासाठी आईस ब्रेकिंग खेळाचे आयोजन करण्यात आले. तसेच संध्याकाळी स्वयंसेवकांनी गावात स्वच्छते विषयी आढावा घेतला.

मंगळवार, दि.२५.१२.२०१८ पासून दररोज, सकाळी ५ ते ६ या वेळेत योगगुरु श्री.शेखरसिंग चौहाण यांनी योग-प्राणायाम व व्यायाम या साठी स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले. प्रार्थना, स्फूर्ती गीत गायन व सुविचार झाल्यानंतर गावातील नीमखेडी रस्त्या लगत बंधारा उभारणी साठी शिबिरार्थींनी बंधारा लगत असलेले गाजरगवत, काटेरी झुडुपे कुर्हाडीच्या सहाय्याने काढले व काही स्वयंसेवकांनी बंधाऱ्याच्या जवळच असलेल्या विहिरीवरचे डबर साखळी पद्धतीने आणले. तसेच काही स्वयंसेवकांनी खोदकाम केले व माती काढली अश्या प्रकारे पहिल्या दिवशी स्वयंसेवकांनी श्रमदान करुन शारिरिक परिश्रम घेतले. दुपारच्या बौद्धिक सत्रात बोदवड महाविद्यालयाचे प्रा. इश्वर म्हसलेकर यांनी स्वयंसेवकांशी स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी कशी करावी व त्यात यश संपादन करण्यासाठीची माहिती दिली. तसेच स्वच्छता, बेटी बचाओ बेटी पढाओ, आपत्ती व्यवस्थापन या विषयावर स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर केले. संध्याकाळी ५ ते ६ या

वेळेत स्वयंसेवकांनी गावकर्यांना स्वच्छतेचे महत्व व संदेश आपल्या कृतीतून म्हणजे गावातील स्वच्छता करुन दिले. रात्रि ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रात्रि ९.०० वा. पूर्ण दिवस भराचा आढावा घेउन अहवाल लेखन केले.

बुधवार, दि. २६.१२.२०१८ रोजी नियमित व्यायामानंतर धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. चहा व नाष्टा नंतर सर्व शिबिरार्थी हे श्रमदानसाठी सज्ज झाले व बंधारा उभारणीसाठी श्रमदान करण्यात आले. बंधार्या जवळ असलेल्या विहिरीचे पाणी साकळी पद्धतीने आणले. पाया उभारणी करुन बांधार्याची उंची जमीन लेवल पर्यंत आणून श्रमदानाचे कार्य पूर्ण केले. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. रत्ना जवरस यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले व महिला सबलीकरण या विषयावर गटचर्चा घडवून आणली. रा.से.यो. विभागीय समन्वयक प्रा. डॉ. ए. आर. सावळे यांनी शिबिरास सदिच्छा भेट देऊन शेतकरी समस्या या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. संध्याकाळी स्वयंसेवक हे गावातील स्वच्छते साठी सज्ज झाले. सांस्कृतिक कार्यक्रमात केंद्र व राज्य शासनातर्फे दिलेल्या निर्देशानुसार पथनाटयाचे सादरीकरण करण्यात आले. रात्रि ९.०० वा. पूर्ण दिवस भराचा आढावा घेऊन अहवाल लेखन केले.

गुरुवार, २७.१२.२०१८ रोजी नित्यक्रमानंतर सर्व स्वयंसेवकांनी श्रमदान करून बंधार्याची उंची ३ ते ४ फूट वाढवली. दुपारच्या बौद्धिक सत्रात ऐणपुर महाविद्यालयाचे प्रा. उमरिवाड यांनी राष्ट्रिय शिक्षण हक्काचे कायदे या विषयावर मार्गदर्शन केले व त्यानंतर बोदवड महाविद्यालयाचे प्रा. एन. एस. जोशी कॅशलेस नेट बँकिंग या आधुनिक विषयावर मार्गदर्शन केले. ग्राम्स्वच्छता आटोपल्या नंतर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी संगीत खुर्चीचे आयोजन करण्यात आले होते.

शुक्रवार, २८.१२.२०१८ रोजी पुन्हा नियमित व्यायामानंतर नियमित व्यायामानंतर धावण्याची स्पर्धा घेण्यात आली सर्व स्वयंसेवक श्रमदानासाठी बंधाऱ्यावर गेले. यादिवशी बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले. बंधार्याची उंची वाढविणे व पिचींग करणे याच बरोबर बंधार्याचे आऊटलेट काढणे आदी कामे स्वयंसेवकांनी केली. पात्रापासून ७ ते ८ फूट उंच, ४ फूट रुंद व २७ फूट लांब अश्या बंधाऱ्याची निर्मिती केली. दुपारच्या बौद्धिक सत्रात हरणखेड येथील मुख्यध्यापिका सौ. बोंडे मॅडम यांनी ताण तणाव व्यवस्थापन या विषयावर स्वयंसेवकांना माहिती दिली. संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत स्वयंसेवकांनी गावकर्यांना स्वच्छतेचे महत्व व संदेश आपल्या कृतीतून म्हणजे गावातील स्वच्छता करुन दिले. रात्रि ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रात्रि ९.०० वा. पूर्ण दिवस भराचा आढावा घेउन अहवाल लेखन केले.

शनिवार, २९.१२.२०१८ रोजी अल्पोपहार नंतर गावा लगत असलेले मंदिर, स्मशानभूमी व गावातील स्वच्छतेचे काम हाथी घेतले. त्यासाठी स्वयंसेवकांचे तीन गट तयार करण्यात आले. एक गट गावातील नालेसफाई व ग्रामस्वच्छता करण्यासाठी गेला, दुसरा गट शाळेतील स्वच्छता व स्मशानभूमी स्वच्छ करण्यासाठी गेला तर तिसरा गट गावातील प्राचीन मंदिर मधिल परिसर स्वच्छ करायला निघाला. दुपारच्या बौद्धिक सत्रात जामनेर येथील प्राध्यापक डॉ. एन.एस.शर्मा यांनी

शिबिरार्थींना पर्यावरण आणि आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत स्वयंसेवकांनी गावकर्यांना स्वच्छतेचे महत्व व संदेश आपल्या कृतीतून म्हणजे गावातील स्वच्छता करुन दिले. रात्रि ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रात्रि ९.०० वा. पूर्ण दिवस भराचा आढावा घेऊन अहवाल लेखन केले.

रविवार, ३०.१२.२०१८ रोजी सकाळी गावातील लोकांमध्ये स्वच्छता व बेटी बचाओ बेटी पढाओ, अश्या विविध विषयांवर आधारित दिंडी काढण्यात आली. या प्रसंगी वरील विषयावर आधारित विविध घोषणा दिल्या तसेच पथनाट्य सादर केले. दुपारच्या सत्रात भोजनानंतर समारोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. समारंभाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.अजयजी जैन हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये गावातील सरपंच सौ.समिता रुपेश गांधी, उपसरपंच श्री. नरहरी वराड़े, संस्थेचे संचालक मा.श्री.श्रीरामभाऊ बडगुजर, मा.श्री.सुभाषजी शर्मा, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डी.एस.पाटील व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

या प्रसंगी शिबिरात घेतलेल्या विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट असलेल्या स्वयंसेवकांचा समारंभाचे अध्यक्ष मा.श्री.अजयजी जैन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वयंसेवक निखिल पाटील, वैशाली माळी यांनी शिबिराबद्दल मनोगत व्यक्त केले. शिबिरात नियोजन केलेल्या संपूर्ण सात दिवसांचे काम नियोजनाप्रमाणे पार पडले.

शिबिर यशस्वी करण्याच्या दृष्टिने संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.मिठूलालजी अग्रवाल, उपाध्यक्ष मा.श्री.अजयजी जैन, सचिव मा.श्री.विकासभाऊ कोटेचा, सर्व संचालक मंडळ सदस्य, प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी, उपप्राचार्य प्रा.डी.एस.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सी.टी.शर्मा, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.सौ.के.आर.दमाडे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.एन.पी.सावदेकर, शुभांगी चौधरी, रा.से.यो. प्रतिनिधी व सर्व स्वयंसेवक यांनी शिबीर यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले.

**डॉ.चेतनकुमार टेकचंद शर्मा**

**कार्यक्रम अधिकारी**



शिबिराचे उद्घाटन करतांना जि.प.शाळेतील अपंग विद्यार्थी कुंदन खराटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.विकासभाऊ कोटेचा व मान्यवर.



उद्घाटन समारंभा प्रसंगी मार्गदर्शन करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.विकासभाऊ कोटेचा



योगा व प्राणायामाचे धड़े शिकवताना योगगुरु श्री.शेखरसिंग चव्हाण.




बौद्धिक सत्रात बेटी बचाओ बेटी पढाओ या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ.रत्ना जवरस




विविध विषयांवर पथनाट्य सादर करतांना स्वयंसेवक






बंधार्याची पाहणी करतांना संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अजयजी जैन, सन्माननीय संचालक, उपप्राचार्य व प्राध्यापक.



समारोप समारंभा प्रसंगी मार्गदर्शन करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री.अजयजी जैन